**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १४ जानेवारी २०२६**

**1. राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान / नागपूर महानगरपालिकेतर्फे दिव्यांग मतदारांकारिता बूथ पर्यंत ये-जा करण्याची विशेष सोय**

**2. छोट्या पक्षांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पक्ष चिन्ह आरक्षित करण्यासाठी उद्यापर्यंत अर्ज करावे लागणार**

**3. देशभरात मकर संक्रांत, उत्तरायण, लोहडी, माघ बिहू आणि पोंगल सणांचा उत्साह**

**4. निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल स्थानी**

-------------------------------------------

**उद्या मतदान**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. या महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या दोन हजार ८६९ नगरसेवकांसाठी ही निवडणूक होत आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे सात ते संध्याकाळी साडे पाच वाजेदरम्यान मतदान होणार आहे. ऐकुया सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता फलके )***

***उद्या संबंधित महापालिका क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसंच मतदारांनी आपल्यासोबत मतदार ओळखपत्र किंवा राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या १२ पैकी कोणताही एक ओळख पुरावा सोबत ठेवणं अनिवार्य आहे. ओळख पुराव्यांमध्ये पासपोर्ट, आधारकार्ड, वाहन चालक परवाना, पॅनकार्ड आदी कागदपत्रांचा समावेश आहे. चार सदस्यीय प्रभागरचनेनुसार मतदारांना अ, ब, क आणि ड अशा चार जागांसाठी स्वतंत्र मतदान करावे लागणार आहे. मतदानातील गोंधळ टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने चार वेगवेगळ्या रंगांची मतदान यंत्रे वापरण्याचा निर्णय घेतला आहे. ‘अ’ साठी पांढरा, ‘ब’ साठी फिकट गुलाबी, ‘क’ साठी फिकट पिवळा तर ‘ड’ साठी फिकट निळा रंग देण्यात आला आहे. मतदान केंद्रांवर***

*मार्गदर्शक सूचना, स्वयंसेवक आणि प्रशिक्षित कर्मचारी तैनात राहणार असून मतदारांना योग्य मार्गदर्शन मिळणार आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरातील २४ लाख ८३ हजारांहून अधिक मतदार ३८ बहुसदस्यीय प्रभागांतून १५१ सदस्यांची निवड करणार असून ९९३ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानासाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून ९६४ इमारतींमध्ये मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत आणि ३२१ संवेदनशील केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतमोजणी १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजतापासून महानगरपालिकेच्या झोन स्तरावर १० ठिकाणी होणार आहे. मतदारांना मतदान केंद्रशोधण्यासाठी मनपाच्या संकेतस्थळासह चॅटबॉट, एआय मित्र आणि 'माय नागपूर' ॲपवर डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फेउद्या होणाऱ्या मतदानासाठी 355 मतदान केंद्र तयार करण्यात आले असून २२०७ कर्मचारी या सर्व प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. जवळपास १२०० पोलीस कर्मचारी सुरक्षेच्या दृष्टीने तैनात करण्यात आले असून चंद्रपूर शहरात एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. दरम्यान अमरावती महानगर पालिका मतदान प्रक्रिये दरम्यान कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनानं आवश्यक ती सर्व तय्यारी केली आहे.*

---------------------------------------------

**दिव्यांग विशेष सुविधा**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी उद्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे.दिव्यांग मतदारांचा मतदानात उत्स्फूर्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मनपा प्रशासनाने विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्वात दिव्यांग मतदारांसाठी **९१ ७५ ४१ ४३ ५५ - 91-75-41-43-55** हा व्हॉट्सॲप क्रमांक सुरू करण्यात आला आहे. या क्रमांकावर लोकेशन शेअर केल्यानंतर दिव्यानंग मतदारांना निवासस्थानावरून मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्याची सुविधा दिली जाणार आहे. प्रत्येक झोनमध्ये एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली असून ही सेवा सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. ही सुविधा उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग मतदारांसाठी मनपा केंद्रीय कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून आठ पथकांमार्फत समन्वय साधण्यात येणार आहे.

---------------------------------------------

**निवडणूक आयुक्त आवाहन**

दरम्यान राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी जनतेला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे:

***(होल्ड बाईट - दिनेश वाघमारे - ४० सेकंद)***

***मतदार हा लोकशाहीचा आधारस्तंभ आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या पाया आहेत. मतदारांना त्यांना लोकशाहीने दिलेला जो अधिकार आहे, तो अधिकार बजावणे अत्यंत आवश्यक आहे. १५ जानेवारी २०२६ रोजी महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. या मतदानाच्या प्रक्रियेमध्ये सर्व मतदारांनी अधिकाधिक सहभागी होऊन त्यांचा जो हक्क आहे, त्यांचा जो अधिकार आहे हा बजावणे अत्यंत आवश्यक आहे. त्याच्यामुळे मी सर्व मतदारांना आवाहन करतो की १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आपण मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपले अमूल्य मत नोंदवा.***

---------------------------------------------

**घरोघरी जाऊन प्रचार**

महानगरपालिका निवडणूकांच्या प्रचाराची समाप्ती झाल्यानंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने कुठलाही नवीन आदेश जारी केलेला नाही. त्यासंदर्भातला आदेश जुनाच असून तो राज्य निवडणूक आयोगाने १४ फेब्रुवारी २०१२ मध्येच जारी केला होता, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. निवडणुकीचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने नवीन नियम लागू केला असल्याचे वृत्त समाजमाध्यमांसह विविध माध्यमातून प्रसारित होत आहे; परंतु हे वस्तुस्थितीला धरुन नाही. याबाबतचा आदेश जुनाच असल्याचं आयोगानं म्हटलं आहे. जाहीर प्रचार समाप्तीनंतर उमेदवार हे मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून आणि घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील; परंतु माईकचा वापर करता येणार नाही आणि उमेदवारांना समुहानेदेखील फिरता येणार नाही, असंही आयोगानं म्हटलं आहे.

---------------------------------------------

**अटींची पूर्तता**

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या आणि विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करून हवं असेल, तर त्यांनी उद्यापर्यंत अर्ज करणं आवश्यक आहे, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. खरं तर यासाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात होण्याच्या ३ दिवस आधी अर्ज करणं अनिवार्य असतं आणि १ दिवस

आधी जिल्हाधिकारी त्यावर निर्णय घेतात. पण काल जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दोन दिवसांतच, म्हणजे १६ जानेवारीपासून नामनिर्देशन पत्र दाखल करायला सुरुवात होणार आहे. त्यामुळे एखाद्या जिल्हा परिषदेच्या गेल्या निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षानं संबंधित अटींची पूर्ता केली असेल तर त्यांना उद्यापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. त्यावर संबंधित जिल्हाधिकारी १६ जानेवारीला निर्णय घेतील.

-------------------------------------------

**संक्रांत सण**

देशभरात आज मकर संक्रांत, उत्तरायण, लोहडी, माघ बिहू आणि पोंगल हे सण साजरे होत आहेत. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. निसर्गाविषयीची कृतज्ञता केवळ शब्दांपुरती न राहता ती आपल्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे, अशी अपेक्षा पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. नवी दिल्ली इथं आज केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांच्या निवासस्थानी आयोजित पोंगल समारंभात ते बोलत होते.देशभरात आज मकरसंक्रांती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. सूर्याच्या उत्तरायणाच्या प्रारंभानिमित्त कडाक्याच्या थंडीला निरोप देत हा सण साजरा केला जातो. कृषिसंस्कृतीशी जोडलेलं हे पर्व देशातल्या विविध भागांत वेगवेगळ्या नावांनी आणि परंपरांनी साजरा करण्यात येतं. यानिमित्त शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करत पंतप्रधान म्हणाले -

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी- १८ सेकंद )***

***हमारे किसान राष्ट्र निर्माण के मजबूत साथी हैं। उनके प्रयासों से आत्मनिर्भर भारत अभियान को बहुत मजबूती मिल रही है। केंद्र सरकार भी किसानों को सशक्त बनाने के लिए प्रतिबद्ध होकर लगातार काम कर रही है।***

मकरसंक्रांतीनिमित्त महाराष्ट्रात पतंगोत्सव देखील उत्साहात साजरा करण्यात येत आहे. मात्र यासाठी नायलॉन मांजाचा वापर कुणीही करू नये असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आलं आहेत.

-------------------------------------------

**महाराष्ट्र अव्वल**

निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असल्याचं नीती आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. निर्यात करण्याबाबतची राज्याची क्षमता आणि तयारी दर्शवणारा चौथा निर्यात सज्जता अहवाल निती आयोगाने आज जाहीर केला. २०२४ या वर्षातल्या डेटावर आधारित या अहवालानुसार महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश,

आंध्रप्रदेश कर्नाटक आणि पंजाब या राज्याचा नंबर लागतो तर लहान आकाराच्या राज्यांमध्ये उत्तराखंड निर्यात सज्जतेत पहिल्या क्रमांकावर आहे.

---------------------------------------------

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतला दुसरा सामना राजकोटमध्ये सुरू आहे. यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करत भारताने ५० षटकांत ७ गडी गमावून भारताने २८४ धावा केल्या. यात के एल राहुलच्या नाबाद ११२ आणि शुभमन गिलच्या ५६ धावांचा समावेश आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ४ षटकांत १० धावा झाल्या आहेत.

---------------------------------------------

**महाटीईटी उत्तरसूची**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या महाटीईटी परीक्षेची अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. विषयतज्ज्ञांच्या अभिप्रायानंतर ही उत्तरसूची जाहीर करण्यात असून यावर कोणतेही आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत.या अंतिम उत्तरसूचीनुसार परीक्षेचा निकाल लवकरच परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.

---------------------------------------------

**हवामान**

विदर्भात आज यवतमाळ जिल्ह्यात ८. ८अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ गोंदिया येथे ११.४ तर नागपुर इथं १२. ४ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. मागील तीन-चार दिवसांपासून नागपूर जिल्ह्यात किमान तापमानात दररोज अंशतः वाढ नोंदवण्यात येत आहे.

---------------------------------------------